**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – संदिप दत्तात्रय आजगावकर
वय – ६१ वर्षे.
व्यवसाय – सेवानिवृत्त कोतवाल
रा/ने – सर्जेकोट, ता. मालवण जि. सिंधुदूर्ग.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोगत्ता श्रीमती यु.आर.जाधव यांचेमार्फत शपथेवर सरू**

१. दि. ३०/१०/२०२३ रोजी पोलीसांनी मला सर्जेकोट जेटी येथे बोटीवरती मारामारी झाली त्याबद्दल पंच म्हणून काम करण्यासाठी बोलविले होते. मी त्या ठिकाणी गेलो होतो. माझ्यासोबत दुसरे पंच रेवंडी गावचे तलाठी श्रीमती यु.एन.पाटील हया होत्या. घटनास्थळ फिर्यादीने दाखविले. घटनास्थळ हे समुद्रात होते. आम्ही सर्जेकोट जेटीवर गेलो. आम्हाला जे नुकसान झाले ते दाखविण्यात आले. त्यानंतर आम्हाला समुद्रात नेण्यात आले. त्या ठिकाणी सर्वत प्रथम समुद्राची खोली मोजण्यात आली. मला एक लाकडी दांडा (एम.ओ.नं.५) तांडेल केरळी यांनी दाखविला. सदर दांडा हा ३.५ फुट उंचीचा भेग पडलेला होता. एक लाकडी मुठ असलेली लोखंडी सुरी (एम.ओ.नं४) होती, एक लोखंडी रॉड (एमओ नं.१) होता, एक गोल आकाराचा त्याला होल असलेला दगड (एमओ नं.२) होता.पोलीसांनी माझ्या समक्ष हे सर्व जप्त केले होते. पोलीसांनी माझ्या समक्ष मुद्देमाल जप्त केला. मला वरील चार वस्तु दाखविण्यात आल्या. सदर एमओ नं. १ ते ४ हामुद्देमाल तोच आहे. सदरचा मुद्देमाल माझे समक्ष जप्त करण्यात आलेला होता.मला दि. ३०/१०/२०२३ रोजीचा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर अ.क्र. २ वर माझी सही आहे. त्यास **<u>नि.क्र.पी३/पीडब्ल्यू२</u>** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**आरोपी क्र. १ ते ६ तर्फे उलट तपास विधिज्ञ श्री. एस.एन.भणगे यांचेमार्फत**

२. हे म्हणणे खरे आहे की, मी गाव कोतवाल म्हणून सेवानिवृत्त झालो आहे. मला अक्षांश व रेखांश समजत नाही. हे म्हणणे खरे आहे की, अक्षांश व रेखांश हे कोणत्या यंत्राने मोजतात हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यामध्ये पान क्र. ११ वर शेवटच्या परिच्छेद मध्ये जे अक्षांश व रेखांश नमूद आहेत ते कोणी लिहिले व कसे लिहिले हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी मच्छीमारी करत नाही व मी मच्छीमार समाजाचाही नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला बोटीवर मासेमारी कोणते कोणते साहित्य असते याची माहिती नाही. मासेमारी किती वाव मध्ये करता येते व किती वावामध्ये करता येत नाही याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला समुद्रांमध्ये पाठविल्यानंतर मी किती वावामध्ये आहे हे मला सांगता येणार नाही. सर्जेकोट पासुन ज्या ठिकाणी आम्ही थांबलो त्याचे अंतर २० किलोमिटर होते. हे म्हणणे खरे आहे की, समुद्रामध्ये आम्ही ज्या ठिकाणी थांबलो होतो त्या ठिकाणी घटनास्थळाच्या खाणाखुणा नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणी आम्ही दगड टाकून खोली मोजली त्या ठिकाणीच घटना घडली होती हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासातील एक लोखंडी रॉड (एमओ नं.१) एक गोल आकाराचा त्याला होल असलेला दगड (एम.ओ.नं.२) एक लाकडी मुठ असलेली लोखंडी सुरी (एम.ओ.नं४) एक लाकडी दांडा (एम.ओ.नं.५) मारामारीसाठी वापरण्यात आले होते हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्या बोटीवर कथीत घटना घडली ती बोट कथीत घटनास्थळावर उभी न राहता सर्जेकोट जेटीवर उभी होती. हे म्हणणे खरे आहे की, ज्या बोटीवर कथीत घटना घडली ती बोट कथीत घटनास्थळावरुन सर्जेकोट जेटीवर कशी आली हे मला माहिती नाही.

३. घटना कोणत्या तारखेला घडली ते मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळेस कथीत घटना घडली त्या वेळेस बोटीची काय अवस्था होती हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील एम.ओ. व्यतिरिक्त मला

दुसरे काही वस्तु दाखविण्यात आल्या नाहीत. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मला जाळी दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, मला दाखविण्यात आलेली जाळी ही बोटीवर नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, जाळी जप्त् केलेली नाहीत. मला माझ्या सरतपसातील नमूद एम.ओ. व जाळी व्यतिरिक्त डिझेलचे बॅरेल, व वायरलेसचे तुटलेले वायर दाखविण्यात आले होते. या व्यतिरिक्त मला आणखी काही दाखविण्यात आलेले नाही. बॅरल व वायर कोर्टासमोर नाही तसेच ते जप्त केलेले नाहीत. वायरलेस सेट कसा असतो ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, वायरलेस सेटला वायर कशाचे असतात ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, ड्रम ताजवट फुटणे म्हणजे काय हे मला सांगता येणार नाही. एका बोटीवर चिन्मयप्रसाद व एका बोटीवर उमरसुलेम असे नमूद होते. पोलीसांनी बोटीचे फोटो काढले होते. दोषारोपपत्रासोबत दाखल असलेले पान क्र. ८ वरील एकूण सहा फोटो दाखविण्यात आले. त्यापैकी दोन फोटोना अर्टीकल पी/१पीडब्ल्यू१ व पी२/पीडब्लू१ देण्यात आलेले आहे. उलट तपासामध्ये इतर चार फोटो दाखविण्यात आले. त्यास अर्टीकल पी३/पीडब्लू२ ते अर्टीकल पी६/पीडब्लू२ देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, सदर फोटो पाहिल्यानंतर सदर बोटी हया चिन्मयप्रसाद व उमरसुलेम आहे हे दिसून येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्या बोटीवर मी कथीत पंचनामा केला त्या बोटी चिन्मयप्रसाद किंवा उमरसुलेम आहे याची मी खात्री केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्याच्या पहिल्या पानावर तारखेमध्ये खाडाखोड केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की,सदर खाडाखोड कुणी केली ते मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, खाडाखोड केल्याच्या ठिकाणी खाडाखोड करणाऱ्या व्यक्तीशी संक्षिप्त सही नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्याच्या दुसऱ्या पानावर कॉलम नं. ७ मध्ये चौथ्या ओळीमध्ये तारीख अपुर्ण लिहिलेली आहे. मी पंचनाम्यामध्ये नकाशा काढताना पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सर्जेकोट जेटीवरुन कवडा रॉक दिसत नाही. मला पंचनाम्यातील पान क्र. ४ वरील कॉलम नं. ९ मधील नकाशा दाखविण्यात आला. तो कोणी रेखाटला हे मला सांगता येणार नाही. हे

म्हणणे खरे आहे की, सदर नकाशामध्ये दोन बोटी रेखाटलेल्या आहेत त्या कोणत्या बोटी आहेत ते मला सांगता येणार नाही. एक वाव म्हणजे दोन मिटर अंतर होय. ज्या दोरीने सुमुद्राची खोली मोजली त्या दोरीची लांबी किती होती ते मला माहित नाही.

४. पंचनामा किती पानाचा होता हे मला माहित नाही. पंचनामा हाताने लिहिलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा सुरवातीपासून शेवटपर्यंत एकदा लिहून काढलेला होता. पंचनामा हा जेटीवर व पाण्यात लिहिण्यात आलेला होता. माझी सही सर्वांत शेवटी घेण्यात आली होती. पंचनाम्यावर मी किती सहया केल्या हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, एक पंचनामा केला तो पुर्ण झाल्यानंतर दुसरा पंचनामा केला तो पुर्ण केला असे काही घडले नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की, दि. ३०/१०/२०२३ रोजी पोलीसांनी मला सर्जेकोट जेटी येथे बोटीवरती मारामारी झाली त्याबद्दल पंच म्हणून काम करण्यासाठी बोलविले होते, मी त्या ठिकाणी गेलो होतो, माझ्यासोबत दुसरे पंच रेवंडी गावचे तलाठी श्रीमती यु.एन.पाटील हया होत्या हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ फिर्यादीने दाखविले, घटनास्थळ हे समुद्रात होते, आम्ही सर्जेकोट जेटीवर गेलो. आम्हाला जे नुकसान झाले ते दाखविण्यात आले, त्यानंतर आम्हाला समुद्रात नेण्यात आले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी सर्वात प्रथम समुद्राची खोली मोजण्यात आली, मला एक लाकडी दांडा (एम.ओ.नं.५) तांडेल केरळी यांनी दाखविला. सदर दांडा हा ३.५ फुट उंचीचा भेग पडलेला होता. एक लाकडी मुठ असलेली लोखंडी सुरी (एम.ओ.नं४) होती, एक लोखंडी रॉड (एमओ नं.१) होता, एक गोल आकाराचा त्याला होल असलेला दगड (एमओ नं.२) होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष हे सर्व जप्त केले होते, पोलीसांनी माझ्या समक्ष मुद्देमाल जप्त केला, मला वरील चार वस्तु दाखविण्यात आल्या, सदर

एमओ नं. १ ते ४ हा मुद्देमाल तोच आहे. सदरचा मुद्देमाल माझे समक्ष जप्त करुन नि.क्र.पी३/पीडब्ल्यू२ जप्ती पंचनामा करण्यात आला हे मी खोटे सांगत आहे.

६. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील एम.ओ. हे बोटीवर जप्त केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी कोतवाल असल्यामुळे खोटी साक्ष देत आहे.

**आरोपी क्र. ७ ते १२तर्फे उलट तपास विधिज्ञ श्री. एन.जे.गोडकर यांचेमार्फत**

७. माझी महसुल खात्यामध्ये २० वर्षे नोकरी झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी कोतवाल असल्यामुळे मी पंच म्हणून काम केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, लोखंडी रॉड भरीव असतो. हे म्हणणे खरे आहे की, लोखंडी पाईप ही गोल व पोकळ असते. हे म्हणणे खरे आहे की, मला लोखंडी पाई व लोखंडी रॉड यामधील फरक कळतो. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालया समोर असलेल्या मुद्देमालामध्ये लोखंडी रॉड नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यातील मजकूर मी पोलीसांना सांगितला व तो पोलीसांनी लिहून घेतला असे घडले नाही.

८. आरोपी क्र. १ ते ६ तर्फे विधिज्ञांनी घेतलेला उलट तपास आरोपी क्र. ७ ते १२ तर्फे विधिज्ञांनी स्वीकृत केला.

उलट तपास पुर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

एम.के.फकीह

दि. १०/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग – १ मालवण.